विशेष विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय,
३ रा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

# -: परिपत्रक :-

क्र. विकअ-२०१२/पतपेढी/कर्जवसुली/आस्था/ब-४४३ मुंबई, दिनांक : 28 MAY 2012

विषय :- मुंबई विक्रीकर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई व नवी मुंबई या संस्थेची कर्ज वसुली.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एमएसई-१०६२/एसए-८६७९, दि. २७.०३.१९६७.
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एमएससी-१०७१/जी, दि. २९.०३.१९७१.
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. वेतन-१०८०/आस्था-६/५, दि. १५.०७.१९८०.
४. कार्यालयाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-१०९४/कर्जवसुली/७८/आस्था-६, मुंबई, दि. ०१.०२.१९९५.

विक्रीकर विभागातील अधिकारी/कर्मचारी सहकारी पतपेढी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत सहकारी पतसंस्था आहे. विक्रीकर खात्यातील अधिकारी/कर्मचारी सदर संस्थेचे सभासदस्यत्व स्विकारतेवेळी, संस्थेच्या मासिक वसुलीची रक्कम व अन्य देय रकमा शासकीय रकमेतून कपात करुन ती पतपेढीत भरणा करण्याचे अधिकार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ४९ (३) नुसार नियुक्ता अथवा सेवायोजकास आहेत.

सदर वसुलीसंबंधी पतसंस्थेने वेळोवेळी मागणी केलेल्या रकमा सभासदाच्या विक्रीकर विभागातून देय असलेल्या वेतनातून कपात करुन पतसंस्थेमध्ये जमा करण्याची, उपरोक्त नियमानुसारची जबाबदारी उपरोक्त संदर्भांकित परिपत्राकांन्वये संबंधित आहरण वितरण अधिकारी यांचेवर सोपवलेली आहे व त्यासाठी संबंधित आहरण व वितरण अधिकारी व्यक्तीशः जबाबदार असतील.

तसेच अधिकारी/कर्मचारी सभासदांनी कर्ज मंजूरीसाठी करारपत्र करतेवेळी, उभयपक्षी करारान्वये मान्य केलेली कर्जाची वसुली, त्यांच्या मासिक वेतनातून किंवा विक्रीकर खात्यातून त्यांना देय असलेल्या अन्य शासकीय रकमेतून कपात करुन घेण्याची संमती दिलेली असते.

असे असुनही पतसंस्थेच्या असे निदर्शनास आले आहे की, काही कार्यालय प्रमुख/आहरण वितरण अधिकारी पतपेढीच्या मागणीनुसार त्यांच्या आस्थापेनवरील अधिकारी/कर्मचा-यांच्या वेतनातून वसुली न करता वसुलीत सवलत देतात. पतपेढीचे व्यवस्थापक मंडळ अथवा व्यवस्थापक यांचे लेखी परवानगीशिवाय देण्यात आलेली अशा स्वरुपाची सवलत, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ४९ चा भंग करणारी आहे.

तसेच स्थानांतरण झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे स्थानांतरणानंतरचे कार्यालय कळत नसल्याने, त्यांचे बाबतीत मागणीपत्र पाठविताना अडचणी येतात. यास्तव या परिपत्राकाव्दारे सर्व कार्यालय प्रमुख व आहरण वितरण अधिकारी यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

या परिपत्रकाव्दारे मुंबई व नवी मुंबई विभागातील सर्व कार्यालय प्रमुख व आस्थापना अधिकारी यांना निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी पतपेढीच्या मागणीनुसार त्यांच्या आस्थापेनवरील अधिकारी/कर्मचारी सभासदाच्या वेतनातून वसुली करुन त्याचा भरणा पतपेढी कार्यालयात विहीत मुदतीत करण्यात यावा. तसेच पतपेढीच्या मागणीनुसार कर्जदार अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्तीनंतर मिळणाऱ्या शासकीय आर्थिक लाभातून संस्थेच्या मागणीनुसार वसुली करण्यात यावी.

सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची आस्थापना, स्थानांतरण अथवा पदोन्नतीने बदलत असल्याने, सदर स्थानांतरण व पदोन्नती आदेश मुंबई विक्रीकर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित यांना अग्रेषित करावेत.

तसेच, सर्व संबंधित कार्यालय प्रमख/आस्थापना अधिकारी यांनी, त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यमुक्त/सेवानिवृत्ती/स्वेच्छा निवृत्ती आदेशाच्या प्रती मुंबई विक्रीकर कर्मचारी पतपेढी मर्यादित, मुंबई व नवी मुंबई यांना अग्रेषित कराव्यात.

विशेष विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. सर्व संबंधित विक्रीकर सहआयुक्त/विक्रीकर उपायुक्त/आस्थापना अधिकारी.
२. प्रबंधक, महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई.
३. प्रमुख कार्यवाह, मुंबई विक्रीकर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई व नवी मुंबई.

विशेष विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय,
३ रा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई १०.

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र.विकअ-२०१२/पतपेढी/कर्जवसुली/आस्था/ब-४४३, मुंबई, दि.२८.०५.२०१२

# शुध्दीपत्रक

क्रमांक : .विकअ-२०१२/आस्था-२/पतपेढी/कर्जवसुली/ब- ५६६ मुंबई, दिनांक : १८/०७/२०१२

या कार्यालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकाच्या परिच्छेद ६ मध्ये "मुंबई व नवी मुंबई विभागातील सर्व कार्यालय प्रमुख व आस्थापना अधिकारी" ऐवजी "विक्रीकर विभागातील सर्व कार्यालय प्रमुख व आस्थापना अधिकारी" असे वाचावे.

विशेष विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. सर्व विक्रीकर सहआयुक्त
२. सर्व आस्थापना अधिकारी
३. प्रबंधक, महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई
४. प्रमुख कार्यवाह, मुंबई विक्रीकर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई व नवी मुंबई
५. निवडनस्ती
६. स्थळप्रत